# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील
# रद्दी पेपर विक्रीसाठी निविदा

सन २०१८ या वर्षाकरिता या सचिवालयातील "अ" वर्ग कोरे फॉर्म्स, वर्तमानपत्रे, नियतकालिके, अहवाल, इत्यादी तसेच अन्य प्रकाशने व "ड" वर्ग (किरकोळ कागद वा रद्दी कचरा) रद्दी विक्रीसाठी बृहन्मुंबईतील इच्छुक ठेकेदारांकडून रद्दी उचलण्यासाठी मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा पाठवितांना निविदाकारांनी "अ" वर्ग रद्दीसाठी रुपये ४०,०००/- व "ड" वर्ग रद्दीसाठी रुपये ३५,०००/- रिझर्व्ह बॅकेत कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई -४०००३२ यांचे नावे **"लेखाशीर्ष ८४४३, महसुली नागरी ठेव"** असे चलनावर नमूद करुन चलनाच्या उजव्या बाजूच्या वरील भागावर **"कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी संकेतांक ००६००५, लेखाशीर्ष संकेतांक ८४४३५०२९०१"** नमूद करुन चलनाद्वारे पैसे भरावेत. चलन व चलनाची छायांकित प्रत व रद्दीचे दरपत्र मोहोरबंद करुन **प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई - ३२** या पत्त्यावर "अ" वर्ग रद्दीची निविदा, "ड" वर्ग रद्दीची निविदा असा उल्लेख करुन **दिनांक २५ जानेवारी, २०१८ रोजी** सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत पाठवाव्यात. रद्दीची "अ" व "ड" वर्गाची अनामत रक्कम स्वतंत्र चलनाने भरावी. रद्दीचा ठेका एक वर्ष मुदतीचा असेल. तसेच 'अ' व 'ड' वर्ग या दोन्ही वर्गाच्या अनामत रक्कमा जमा करणाऱ्या निविदाकारांचाच रद्दी ठेकेदासाठी विचार करण्यात येईल. निविदेसंदर्भातील अन्य अटी व शर्ती संदर्भातील माहिती **या सचिवालयाच्या www.mls.org.in या संकेतस्थळावर** तसेच कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, कक्ष क्र.०१७, तळ मजला, विधान भवन, मुंबई यांचेकडे उपलब्ध असून निविदाकाराने निविदा सादर करताना सदर अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे. विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या निविदांवर अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे असतील.

**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
**विधान भवन, मुंबई**

**निविदेकरिता खालील अटी व शर्ती नमूद करण्यात येत आहेत.**

१) विक्रीकर कार्यालयाचे नोंदणी प्रमाणपत्र (फॉर्म -१०२) जोडावा लागेल.

२) विक्रीकर भरणा, निपटारा प्रमाणपत्र (फॉर्म-४१५) अथवा निविदेतील सहभाग दिनांकापर्यंत विक्रीकर भरणा केल्याचे चलन(फॉर्म एम.टी.आर.-६) जोडावा लागेल.

३) आयकर तपशिल (मागील तीन वर्षातील २०१४-१५, २०१५-१६, २०१६-१७)

४) पॅन कार्डची छायांकित प्रत.

५) मागील तीन वर्षातील लेखापरिक्षीत लेख्याचे टाळेबंद पत्रक. (सन २०१४-१५, २०१५-१६, २०१६-१७)

६) मुंबई महानगरपालिका अधिनियमातील कलम-१३४ अनुषंगिक महापालिकेच्या लायसन्स डिपार्टमेंटचे प्रमाणपत्र जोडावे लागेल.

७) रद्दी विक्रीमधील वार्षिक उलाढाल रु.५ लाखापेक्षा जास्त असणे आवश्यक असून त्यासंदर्भातील कागदपत्र जोडावे लागतील.